महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. बनुयो-०२१९/प्र.क्र.१५३/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक २८ जून २०१९.

विषय :- "महाराष्ट्रात बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई योजना, २०१४" याकरिता चालू वित्तीय वर्षात (सन २०१९-२०) एप्रिल २०१९ ते जुलै २०१९ या चार महिन्यांच्या कालावधीकरिता लेखानुदान म्हणून प्राप्त निधी वितरित व खर्च करणे यांकरिता मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२) महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. मराविसेप्रा/ २०१९/ ९३६, दिनांक ०१.०४.२०१९.

ज्ञापन.

महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०१९ (सन २०१९ चा महा. अधि. क्र.२) द्वारे एप्रिल २०१९ ते जुलै २०१९ या कालावधीकरिता अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा निधी (लेखानुदान) अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर प्रशासनिक विभागांना वितरित करण्यात आला आहे. उक्त निधी तात्काळ वाटप करण्याबाबत शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ द्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

२. त्या अनुसार गृह विभाग, मागणी क्र. बी-१, २०५५, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०८) बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसानभरपाई निधी, (०८)(०१) गुन्ह्यामध्ये बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा त्याच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई (कार्यक्रम) (२०५५०६७८), ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर), या तपशीलवार लेखाशीर्षाखाली प्राप्त अनुदान रु.६,६६,६४,०००/- *(रुपये सहा कोटी, सहासष्ट लक्ष, चौसष्ट हजार फक्त)* खर्च करण्यास, पुढील अटींवर, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे.

<u>अटी</u>-

१) उक्त निधीचे उपयोजन प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक राहील.
२) उक्त निधीच्या खर्चाबाबतचे अभिलेख लेखापरीक्षेकरिता उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

३. हे ज्ञापन, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/ प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९, अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०६२९११५२४३३६२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad0118449
3f2735ad885627, postalCode=400032, street=2ND
FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI,
serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b9532
2e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.06.29 11:59:58 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सदस्य सचिव,
महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.
१०५, सा.बां. विभाग इमारत, मुंबई उच्च न्यायालय,
फोर्ट, मुंबई.

प्रत-

१) पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) सचिव, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण- सर्व जिल्हे *(सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई, यांच्यामार्फत).*
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६) जिल्हा कोषागार अधिकारी-सर्व जिल्हे.
७) प्रधान महा लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
८) महा लेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
९) कार्यासन अधिकारी (अर्थसं.-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड फाईल (पोल-७).